# सर्पदंश

आपल्या विद्यालयात किवा आपल्या घरात अथवा परिसरात किंवा कोठेही साप निघाल्यास काय करावे...? तसेच काय करू नये ...?



साप हा वन्य प्राणी कुठीही आढळू शकतो त्याच्या शरीराचे तापमान नीश्चित नसते. त्या मुळे बदलत्या वातावरणानुसार सापाला सतत जागा बदलत फिरावे लागते. अंधारी व थंडी जागा सापडल्यास तेथे काही काळाकरिता साप मुक्काम करतो.

**साप आढळल्यास काय करू नये.**

1. आरडा ओरड करून गर्दी जमा करू नये.
2. सापाला मारण्याचा प्रयत्न करू नका.
3. कपडे जाळून धूर करू नका.
4. सापावर रॉकेल पेट्रोल अथवा कोणतेही रसायन टाकण्याचा प्रयत्न करू नका.
5. सापाला इलेक्ट्रिक शॉक देण्याचा प्रयत्न करू नका.
6. सापांविषयी कोणतीही माहिती नसताना साप पकडण्याचा प्रयत्न करू नका.
7. उत्सुकतेपोटी सापाच्या अगदी जवळ जाऊन बघण्याचा प्रयत्न करू नका.
8. सापाला काडीने अथवा दगडाने त्रास देण्याचा प्रयत्न करू नका.

9. एकाच वेळी अनेक सर्प मित्रांना फोन करू नका.
10. सर्प मित्राला फोन केल्यावर सापाला मारूच नका.
11. सर्प मित्राची वाहने हवेवर किंवा पाण्यावर चालत नाही तेव्हा पेट्रोलाचा खर्च मिळणे अपेक्षित आहे.
12. सर्प मित्रांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे मानधन किवा मेहंनताना मिळत नाही.

## साप आढल्यास काय करावे?

1. साप जिथे असेल तिथे दुरून बारीक लक्ष ठेवावे.
2. नजीकच्या सर्प मित्राला त्वरित संपर्क करावा.
3. सापाला सुरक्षित ठेवण्यासाठी बरणी/ पिशवी/डबा आधीच तयार ठेवावे.
4. सर्प मित्राला योग्य सहकार्य करावे.
5. सर्प मित्र साप पकडत असताना कोणीही मध्ये मध्ये ढवळा- ढवळ करू नये.

## साप घरात येऊ नये यासाठी घेण्याची खबरदारी.

1. निरुपयोगी सामान घरात जमा करून ठेऊ नका.
2. घरातील आतील बाहेरील भिंतीच्या भेगा/ छिद्रे ताबडतोब बुजवा.
3. घरच्या भिंतीला लागून विटा-दगड-किंवा फरशाचे तुकडे जमा करून ठेऊ नका.
4. संडास बाथरूम नाल्याना जाळ्या बसवा.
5. घरातील पाली उंदीर यांचा बंदोबस्त करा.
6. घरातील खिडक्या दारांना बारीक जाळ्या बसवा.
7. घराच्या बाहेरील बाजूस दारांना उंबरठे लावावे.

8. सिंगल पल्याच्या दारांना खालून फट असते ती फट राहू नये याची खबरदारी घ्या. (स्पंज किवा रेक्जिनची पट्टी लावा.)

## उंदरांचा उपद्रव टाळण्यासाठी

1. 100 मिलि कार्बोलिक ॲसिड
2. 100 मिलि फिनाईल
3. 100 मिलि गोमूत्र
4. 10 लिटर पानी

   यांचे मिश्रण शाळेच्या, घरच्या, गोडाऊनच्या अडचणीच्या जागी फवारावे. या , मिश्रणाचा प्रभाव 1 महिना राहील. पावसाळ्यात पाऊस आल्यास दर 15 दिवसांनी फवारावे. हे मिश्रण लहान मुलांपासून दूर ठेवावे.

## सर्प दंश झाल्यास घ्यावयाची खबरदारी

1. दंश ग्रस्त व्यक्तिला धावपळ करू देऊ नका.
2. दंश ग्रस्त भागाची कमीत कमी हालचाल करावी.
3. दंशच्या वरील भागावर पट्टी किंवा क्रेप बँडज बांधावे.
4. चिरा मारायचे तंत्र माहीत नसल्यास चिरा मारूच नये.
5. दंशच्या जागेवर बर्फ लावावा तो भाग गोठवावा.
6. दंश ग्रस्त व्यक्तीस ताबडतोब नजीकच्या दवाखान्यात न्यावे. जिथे ASV अँटी स्नेक व्हेनम उपलब्ध आहे.
7. कोणत्याही मंत्राने अथवा जडीबुटीने सापाचे विष उतरत नाही. तेव्हा लवकरच उपचार घेतल्यास दंशग्रस्त व्यक्ति 100% वाचेल.

# जिल्ह्यातील सर्पमित्र

| अ.क्र. | नाव | शहर | दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|
| 1 | श्री कोडिण्य | वाशिम | 9527502012 |
| 2 | प्रशांत जोशी | वाशिम | 9822640318 |
| 3 | प्रकाश फेदरे | वाशिम | 9326944801 |
| 4 | पवन फेदरे | वाशिम | 9890249200 |
| 5 | प्रवीण जोशी | वाशिम | 9881188861 |
| 6 | योगेश जोशी | वाशिम | 9850590801 |
| 7 | प्रा. राजा गोरे | कारंजा | 9823296496 |
| 8 | धनराज पवार | कारंजा | 9823788437 |
| 9 | चरण रठोड | कारंजा | 9923214214 |
| 10 | सतेन्द्र बदीपात | कारंजा | 9370475721 |
| 11 | उमेश माहीतकर | कारंजा | 9422888468 |